# जाहिरात

एकात्मिक बाल विकास सेवा योजना, बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) अहिल्यानगर पूर्व यांचे कार्यालय अंतर्गत अंगणवाडी मदतनीस भरती प्रक्रिया सन 2024-25 साठी नगरपालिका जामखेड, नगरपालिका शेवगाव, नगरपंचायत कर्जत ,नगरपालिका श्रीगोंदा ,नगरपंचायत नेवासा या शहरातील अंगणवाडी मदतनीस या रिक्त पदासाठी अनुक्रमे रक्कम रु. 7500/- प्रति महिना असे एकत्रित मानधनी तत्वावर निवडीसाठी सरळ नियुक्तीने (By Nomination) भरण्यासाठी जामखेड, शेवगाव, कर्जत ,श्रीगोंदा व नेवासा या शहरातील पात्र महिला उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीनुसार विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अटी व शर्ती खालील प्रमाणे:**

1. **शैक्षणिक पात्रता:** अंगणवाडी मदतनिस पदासाठी अर्जदार किमान 12 वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. इ. 12 वीचे गुणपत्रकाची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक असुन सदरील गुणपत्रक नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यात येईल. यापेक्षा उच्चतम शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवाराने अर्जात दर्शविलेल्या आवश्यक शैक्षणिक कागदपत्राच्या छायांकित प्रती सांक्षाकित करुन अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
2. **वास्तव्याची अट:**-उमेदवार महिला स्थानिक रहिवासी असावी. स्थानिक रहिवाशी म्हणजेच ज्या शहरातील अंगणवाडी मदतनीस पदासाठी अर्ज केलेला असेल त्याच शहरातील अर्जदार महिला रहिवाशी असणे आवश्यक आहे. यासाठी रहिवाशी दाखला म्हणुन शासकिय दस्ताऐवज (जसे रेशनकार्ड/मतदान कार्ड/वीज देयक/दूरध्वरी देयक/घरपट्टी इ. ) जोडणे आवश्यक आहे.
3. **वयाची अट:**-अंगणवाडी मदतनिस या पदासाठी वयोमर्यादा किमान 18 वर्षे व कमाल 35 वर्षे राहिल. तसेच विधवा उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा 40 वर्षे राहिल. त्याकरीता शाळा सोडल्याचा दाखला किंवा 10वी उत्तीर्ण बोर्डाचे प्रमाणपत्र किंवा जन्मदाखल्याची सत्यप्रत जोडणे आवश्यक राहिल. उमेदवाराचे किमान व कमाल वय (दि. 18/02/2025) रोजीच्या दिनांकास गणण्यात येईल.
4. **लहान कुटुंब:**- वरील पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांस लहान कुटुंबाची अट लागु राहिल. उमेदवारांस दोन पेक्षा जास्त हयात अपत्ये (दत्तक दिलेल्या अपत्यांसह) नसावीत. अर्जासोबत दिलेल्या नमुन्यात लहान कुटुंबाबतचे प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक राहिल. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
5. **मराठी भाषेचे ज्ञान:**- रिक्त पदांचा तपशिल दर्शविणाऱ्या तक्ता अ ते इ मधील सर्व अंगणवाडी मदतनिस रिक्त पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे इ. 10 वी अथवा त्यापुढील शैक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक राहिल.
6. **उमेदवार विधवा असल्यास** :- सक्षम प्राधिकाऱ्याचे पतीचे मृत्यु प्रमाणपत्र जोडावे.
7. **उमेदवार अनाथ असल्यास** :- संबंधित विभागीय उप-आयुक्त, महिला व बाल विकास विभाग यांचे प्रमाणपत्र जोडावे.
8. **मागासवर्गीय उमेदवारांनी** सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीसह अर्ज करावा.
9. **अनुभव** :- उमेदवारास एकात्मिक बाल विकास सेवा योजनेची अंगणवाडी मदतनीस म्हणुन कामाचा किमान दोन वर्षाचा अनुभव असल्याशिवाय अनुभवासाठी असलेले गुण देण्यात येणार नाहीत. असा अनुभव उमेदवारांस असल्यास त्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्याचे अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. मान्यता प्राप्त खाजगी व स्वयंसेवी, अनुदानित संस्थेतील कामाचा अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही व याबाबतचा कोणताही युक्तीवाद उमेदवाराने केल्यास अपात्र ठरविण्यात येईल.
10. अंगणवाडी मदतनीस या पदांसाठी जाहिरातीत दिलेल्या नमुन्यात स्वतंत्र अर्ज करणे बंधनकारक आहे. विहीत नमुन्यातील अर्ज सादर करताना प्रकल्पातील ज्या नगरपालिका / नगरपंचायत या क्षेत्रातील रिक्तपदासाठी अर्ज केला आहे त्याचा स्पष्ट उल्लेख अर्जात करणे आवश्यक आहे.
11. उमेदवाराने मदतनीस पदासाठी एकच अर्ज सादर करावा. अर्जासोबत जन्मतारखेचा पुरावा, शैक्षणिक पात्रतेबाबत गुणपत्रक व प्रमाणपत्र (दहावी, बारावी, पदवुत्तर, डी एड, बी एड, MS-CIT इ.) ज्ञातीचे प्रमाणपत्र (स्वत:चे नावाचे), अनुभव प्रमाणपत्र, विधवा (अटी व शर्तीमधील क्र. 6 नुसार दाखला), अनाथ महिला असल्यास (अटी व शर्तीमधील क्र. 7 नुसार दाखला) इ. च्या सक्षम प्राधिकाऱ्याकडुन साक्षांकित केलेल्या प्रती जोडणे आवश्यक आहे. सदरचे सर्व आवश्यक कागदपत्र जोडले नसल्यास अगर साक्षांकित नसल्यास याबाबतचे गुण दिले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी. तसेच अर्ज सादर करण्याचा **अंतिम दिनांक 18.02.2025 रोजी सायकाळी 06.15** नंतर कोणत्याही प्रकारचे दस्तऐवज स्विकारले जाणार नाही.
12. **अर्जात शहराचे नाव व पदाचे नाव नमुद केलेले नसणे, अर्ज अपुर्ण भरलेला असणे, खाडाखोड असणे, उमेदवाराची विहीत ठिकाणी स्वाक्षरी नसणे तसेच अर्जाच्या सोबत सर्व आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या छायांकित व साक्षांकित प्रती नसणे इ. कारणांमुळे अर्ज अपात्र ठरविण्यात येतील व त्यासंबंधी उमेदवारांस कळविण्यात येणार नाही.**
13. **अंतिम दिनांक 18.02.2025 रोजी सायकाळी 06.15** नंतर कार्यालयात अर्ज स्विकारले जाणार नाही.अंतिम दिनांका नंतर आलेल्या किंवा डाकेने (पोष्टामुळे) विलंब झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.
14. **निवड कार्यपध्दती** :- महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-2022/प्र.क्र.94/का-6, दिनांक 02.02.2023 तसेच मा.एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयफक्तालय महाराष्ट्र राज्य नवी मुंबई यांचे कडील पत्र क्रं. एबाविसेयो/अंगणवाडी /का-7/2024-25/517 नवी मुंबई दिनांक 31.01.2025 नुसार उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन इयत्ता 12वी/पदवी/पदव्युत्तर/पदविका /डिएड/बीएड/संगणक अर्हता उत्तीर्ण प्रमाणपत्र यामध्ये त्यांना मिळालेलया गुणांनुसार तसेच विधवा/अनाथ, जात प्रवर्ग, अनुभव इ. साठी त्यांचे प्रमाणपत्रांवरुन मिळालेल्या एकुण गुणांनुसार गुणाक्रमांने पात्र उमेदवारांची शहरातील रिक्त पदांच्या संख्यानुसार निवड करण्यात येईल. या पदांकरीता लेखी परीक्षा अथवा मुलाखत घेतली जाणार नाही. अर्जा सोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांनुसार शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे उमेदवारांना गुण

Mahabharti.in

देऊन प्राथमिक गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल. त्यावर अर्ज करणाऱ्या उमेदवारांना आक्षेप/तक्रार असल्यास अर्ज केलेल्या उमेदवारांनी 10 दिवसांचे आत लेखी तक्रार बाल विकास प्रकल्प अधिकारी(नागरी ) अहिल्यानगर पूर्व कार्यालयाकडे सादर करावी. सदर तक्रारींची शहानिशा करुन अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल.

15. अंतिम निवड झालेल्या उमेदवारानांच निकालाबाबत कळविण्यात येईल. इतर उमेदवारांना कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.
16. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व /किंवा अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी /नियुक्ती सदर प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर किंवा निवड झाल्यानंतरही रद्द करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्ती वेळी मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहिल. अन्यथा निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांना सर्व अट व शर्ती मान्य असल्याचे रु. 100/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन देणे बंधनकारक राहिल.
17. एखाद्या उमदेवाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यांस निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.
18. अंगणवाडी मदतनिस यांना शासन दरानुसार दरमहा मानधन देय आहे. शासकिय नियमानुसार एकत्रित मानधनात वेळोवेळी करण्यात आलेली वाढ नियमानुसार अनुज्ञेय राहिल. मात्र मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते सवलती अनुज्ञेय नाही.
19. अंगणवाडी मदतनिस हे एकत्रित मानधनावरील मानधनी स्वरुपाचे पद आहे. सदर पद बढती/बदली/सेवानिवृत्ती/वेतनवाढ इ. शासकिय सवलतीस पात्र नाही.
20. संबंधित शहरातील अंतिम निवड यादी जाहिर झाल्यांनतर गुणानुक्रमे अंगणवाडी मदतनिस यांची निवड करण्यात येईल. व गुणानुक्रमानुसार अंगणवाडी केंद्र देण्यात येईल. त्यामुळे निवड झालेल्या उमेदवारांना त्या-त्या शहरातील कोणत्याही अंगणवाडी केंद्रावर काम करावे लागेल. उमेदवाराची एकदा नियुक्ती झाल्यावर कोणत्याही परिस्थितीत त्यांची इतर ठिकाणी बदली करता येणार नाही. तसेच त्यांचे निवासस्थानापासुन नियुक्ती देण्यात आलेल्या ठिकाणापर्यंत कोणताही प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही. त्याचप्रमाणे नियुक्ती झालेल्या ठिकाणी सतत गैरहजर राहिल्यास त्यांची नियुक्ती खंडीत करणेत येईल. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपूर्वी विहीत नमुन्यात करारनामा करुन देणे बंधनकारक राहिल.
21. **प्रतिक्षा यादी**:- एकुण प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारावर उमेदवारांची प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल. काही कारणामुळे उमेदवार नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन 30 दिवसांत रुजु न झाल्यास किंवा त्यांस अपात्र ठरविण्यात आल्यास प्रतिक्षा सादीतील गुणानुक्रमानुसार पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल व सदर क्षेत्रात कोणत्याही कारणास्तव पद रिक्त झाल्यास अथवा नविन पद निर्मीती झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांस गुणागुक्रमे नियुक्ती देण्यात येईल. सदर प्रतिक्षा यादी निकाल जाहीर झाल्यापासुन एक वर्ष वैध राहिल.
22. **अपिल**:- मदतनिस या पदावरील घोषित निवडी संदर्भात कोणत्याही उमेदवाराची तक्रार असल्यास निवड यादी घोषित झाल्यापासुन 30 दिवसांची आंत विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे तक्रार करावी व मा. विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग, नाशिक यांनी दिलेल्या निर्णयामुळे तक्रारदारचे समाधान झाले नसल्यास मा. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचेकडे पुढील 60 दिवसांत अपिल दाखल करता येईल.
23. **सेवा समाप्तीसाठी वयाची अट**:- या शासन निर्णयान्वये नियुक्त होणाऱ्या अंगणवाडी मदतनिस यांची सेवा वयाची 60 वर्षे पुर्ण होईपर्यंत किंवा त्या शारीरिक दृष्ट्या काम करण्यास सक्षम नसल्यास यापैकी जे आधी घडेल तोपर्यंतच सुरु ठेवण्यात येईल.
24. जाहिरातीमधील कोणत्याही मुद्याबाबत साशंकता अगर संदिग्धता निर्माण झाल्यास संबंधित शासन निर्णयातील तरतुदी अंतिम राहतील.तसेच प्रकल्पातील अंगणवाडी मदतनीस पदांच्या रिक्त पदांनमध्ये कमी जास्त करण्याचे अधिकार या कार्यालयाने स्व:ताकडे राखुन ठेवले आहे.
25. **पत्रव्यवहार**: भरती प्रक्रियेसंबंधी अर्जदारांस कोणताही पत्रव्यवहार केला जाणार.नाही. सर्व सूचना जाहिरातीमधील अटी व शर्तीप्रमाणे असुन वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचना कार्यालयीन नोटीस बोर्डावर लावण्यात येतील.

**अर्ज सादर करण्याचा पत्ता -** **बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी अहिल्यानगर पूर्व, नागुल बिल्डिंग पहिला मजला, डॉ.घोरपडे हॉस्पीटल जवळ, दिल्ली गेट, अहिल्यानगर 4140001**

**अर्ज स्विकारण्याचा कालावधी** :- 05.02.2025 **पासुन** 18.02.2025 **पर्यंत**

**अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक** 18.02.2025

**अर्ज स्विकारण्याची वेळ** - **सकाळी**. 11 **ते साय**. 05. **वाजे पर्यंत**

बाल विकासप्रकल्प अधिकारी
नागरी अहिल्यानगर पूर्व

Mahabharti.in

## रिक्त अंगणवाडी मदतनिस पदे दर्शविणारा तक्ता अ

**नगरपंचायत नेवासा क्षेत्राकरीता (एकुण रिक्त पदांची संख्या 01 )**

बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) अहमदनगर पूर्व

| अ.क्र. | अंगणवाडी क्र. | अंगणवाडी चे नाव | भरावयाच्या रिक्त मदतनिस पद संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 7 | शेजुळ गल्ली नेवासा | 1 |
| 2 | | | |
| 3 | | | |
| 4 | | एकुण | 1 |
| 5 | | | |

स्वाक्षरी

श्रीमती आर .आर. कूलकर्णी (मुख्यसेविका)

बिट -नेवासा

CHILD DEVELOPMENT
PROJECT OFFICER
A.NAGAR (URBAN) EAST

# रिक्त अंगणवाडी मदतनिस पदे दर्शविणारा तक्ता ब

**नगरपालिका जामखेड क्षेत्राकरीता (एकुण रिक्त पदांची संख्या 01 )**

बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) अहमदनगर पूर्व

| अ.क्र. | अंगणवाडी क्र. | अंगणवाडी चे नाव | भरावयाच्या रिक्त मदतनिस पद संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 16 | अहिल्यानगर जामखेड 01 | 1 |
| 2 | | | |
| 3 | | एकुण | 1 |

स्वाक्षरी

श्रीमती आर .आर. कूलकर्णी (मुख्यसेविका)

बिट -जामखेड 01/02

CHILD DEVELOPMENT
PROJECT OFFICER
A.NAGAR (URBAN) EAST

## रिक्त अंगणवाडी मदतनिस पदे दर्शविणारा तक्ता क

**नगरपालिका शेवगांव क्षेत्राकरीता (एकुण रिक्त पदांची संख्या 06 )**

बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) अहमदनगर पूर्व

| अ.क्र. | अंगणवाडी क्र. | अंगणवाडी चे नाव | भरावयाच्या रिक्त मदतनिस पद संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 2 | राम नगर शेवगांव 01 | 1 |
| 2 | 11 | भास्कर वाडी शेवगांव 01 | 1 |
| 3 | 19 | माळीगल्ली शेवगांव 01 | 1 |
| 4 | 10 | सोनमिया वस्ती शेवगांव 02 | 1 |
| 5 | 18 | ब्राम्हण गल्ली शेवगांव 02 | 1 |
| 6 | 19 | ईदगाह मैदान शेवगांव 02 | 1 |
| 8 | | **एकुण** | 6 |

स्वाक्षरी

श्रीमती व्ही . एल. तिजोरे (मुख्यसेविका)

बिट -शेवगांव 01/02

CHILD DEVELOPMENT
PROJECT OFFICER
A.NAGAR (URBAN) EAST

## रिक्त अंगणवाडी मदतनिस पदे दर्शविणारा तक्ता ड

**नगरपंचायत कर्जत क्षेत्राकरीता (एकुण रिक्त पदांची संख्या 02 )**

बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) अहमदनगर पूर्व

| अ.क्र. | अंगणवाडी क्र. | अंगणवाडी चे नाव | भरावयाच्या रिक्त मदतनिस पद संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 3 | बेलेकर कॉलनी कर्जत | 1 |
| 2 | 18 | पळस वाडा कर्जत | 1 |
| | | | |
| | | | |
| | | एकुण | 2 |

स्वाक्षरी

श्रीमती व्ही . एल. तिजोरे (मुख्यसेविका)

बिट - कर्जत

CHILD DEVELOPMENT
PROJECT OFFICER
A.NAGAR (URBAN) EAST

## रिक्त अंगणवाडी मदतनिस पदे दर्शविणारा तक्ता इ

**नगरपालिका श्रीगोंदा क्षेत्राकरीता (एकुण रिक्त पदांची संख्या 01 )**

बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) अहमदनगर पूर्व

| अ.क्र. | अंगणवाडी क्र. | अंगणवाडी चे नाव | भरावयाच्या रिक्त मदतनिस पद संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 26 | ढोरगल्ली श्रीगोंदा | 1 |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | एकुण | 1 |

स्वाक्षरी

श्रीमती व्ही . एल. तिजोरे (मुख्यसेविका)

बिट - कर्जत / श्रीगोंदा

CHILD DEVELOPMENT
PROJECT OFFICER
A.NAGAR (URBAN) EAST

# अंगणवाडी मदतनीस ( मानधनी ) पदासाठी अर्जाचा विहित नमुना

उमेदवाराचा
अलिकडील काळातील
काढलेला रंगीत फोटो

प्रति,
मा.बाल विकास प्रकल्प अधिकारी
नागरी अहिल्यानगर पूर्व.

मी कु./श्रीमती ----------------------------------------------------------------------खाली सही करणार ------------------------------------------

----------------------------या शहरातील रहिवाशी असून मी बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी अहिल्यानगर पूर्व प्रकल्पातील----------

----------------या नगरपालिका / नगरपंचायत क्षेत्रातील रिक्त मदतनीस या पदासाठी अर्ज सादर करीत आहे. त्यासाठी माझी वैयक्तीक व शैक्षणिक माहिती खालीलप्रमाणे-

१. विवाहपुर्वीचे नाव ---------------------------------------------------------------------------------------

२. विवाहानंतरचे नाव ---------------------------------------------------------------------------------------

३. संपूर्ण पत्ता ---------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------

४. मोबाईल क्रमांक -

५. जन्मतारीख

(जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला/दहावी बोर्डाचे प्रमाणपत्र इ.यापैकी कोणत्याही एका प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडावी.)

६. दि. १८/०२/२०२५ रोजीच्या दिनांकास असलेले वय - वर्षे---------------महिने-----------दिवस--------------

७. धर्म --------------------- जात/पोटजात ----------------------------------- संवर्ग --------------------

८. मागासवर्गीय आहे काय ? होय /नाही --------------------------------

(असल्यास जातीचे प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडावी)

९. उमेदवार स्थानिक रहिवासी आहे काय ? होय /नाही ------------------------------

(असल्यास सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडावी)

१०. विवाहित/अविवाहित ------------------------------

११. हयात असलेल्या अपत्यांची संख्या मुले------------ मुली---------- एकुण अपत्ये----------

१२. विधवा/अनाथ आहे काय -----------------------------------------------

(अटी व शर्तीमध्ये नमुद शासकीय दस्तऐवज व विधवा /अनाथ असल्यास प्रमाणपत्र सत्यप्रती जोडावी.)

१३. शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | शिक्षण | उत्तीर्ण वर्ष | शाळेचे/बोर्डाचे/विद्यापीठाचे नाव | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | इयत्ता दहावी पास | | | | |
| २. | इयत्ता बारावी पास | | | | |
| ३. | पदवी | | | | |
| ४. | पदव्युत्तर पदवी | | | | |
| ५. | डि.एड | | | | |
| ६. | बी. एड | | | | |
| ७ | शासन मान्य संस्थेचे संगणक परीक्षा प्रमाणपत्र MS-CIT | | | | |

१४. शासकिय अंगणवाडी सेविका/अंगणवाडी मदतनिस पदाचा कमीत कमी २ वर्षाचा अनुभव आहे का ? या पदाचा अनुभव

(अनुभव कालावधीचे प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडावी)

| एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत अनुभव असल्यस अनुभवाचा तपशिल | पद | कालावधी (पासुन -पर्यंत) |
|---|---|---|
| | | |

१५.

| अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे:- (सत्यप्रतीत जोडणे आवश्यक ) | होय | नाही |
|---|---|---|
| १) विहीत नमुन्यातील व स्वहस्ताक्षरातील फोटो लावलेला अर्ज | | |
| २) रहिवाशी पुरावा<br>रेशनकार्ड/मतदान कार्ड/वीज देयक/दूरध्वरी देयक/घरपट्टी इ. पैकी कोणतेही एक) | | |
| ३) शैक्षणिक पात्रतेचेकागदपत्रे<br>इयत्ता १० वीचे गुणपत्रक व प्रमाणपत्र | | |
| इयत्ता १२ वीचे गुणपत्रक व प्रमाणपत्र | | |
| पदवीचे गुणपत्रक व प्रमाणपत्र | | |
| पदव्युत्तर पदवीचे गुणपत्रक व प्रमाणपत्र | | |
| डिएड चे गुणपत्रक व प्रमाणपत्र | | |
| बीएडचे गुणपत्रक व प्रमाणपत्र | | |
| MS-CIT प्रमाणपत्र | | |
| ४) वयाचा पुरावा- | | |
| i. १० चे बोर्ड सर्टिफिकेट | | |
| ii. जन्म दिनांक नमुद असलेलाशाळा/महाविदयालय सोडल्याचा दाखला | | |
| iii. नगरपालिका/महानगरपालिका/ग्रामपंचायतीचा जन्म दाखला. | | |
| ५) विधवा व अनाथ मुलींचे प्रमाणपत्र (असल्यास):- | | |
| ६) विवाह दाखला | | |
| पतीचा मृत्युप्रमाणपत्र | | |
| पुर्नविवाह न केल्याचे प्रतिज्ञापत्र | | |
| ७) जात प्रमाणपत्र /जातीचादाखला(लागु असल्यास) | | |
| ८) अंगणवाडी सेविका / अंगणवाडी मदतनीस म्हणूनकमीतकमी २ वर्षाचा अनुभव असणा-या अनुभवाचा दाखला (असल्यास) | | |
| ९) लहानकुटुंबप्रतिज्ञापत्र | | |

वरील प्रमाणे दिलेली माहिती खरी असुन अर्जासोबत जोडलेल्या कागद पत्रा नुसार माझी माहिती खोटी/चुकीची आढळल्यास माझा अर्ज बाद करण्यात येईल. किंवा माझी निवड/नियुक्ती झाल्यानंतरही माझी नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. व त्यास माझी काहीही हरकत नसेल. व नियमानुसार कारवाईस मी पात्र ठरेल. याची मला पुर्ण जाणीव आहे. तसेच जाहिरीती मधील नमुद अटी व शर्ती मी पूर्णपणे वाचलेल्या असून त्या सर्व मला मान्य आहेत.

ठिकाण:- स्वाक्षरी --------------------------------

दिनांक :- उमेदवाराचे नांव --------------------------------

परिशिष्ट

महाराष्ट्रनागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५नुसार

## अर्जासोबत जोडावयाच्या लहानकुटुंबाच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना

प्रतिज्ञापत्र

**नमुना -ब**

**(नियम ४ पहा)**

मी,श्रीमती. ------------------------------------------------------------------------------------------

श्री.------------------------------------------------------यांचा /यांची मुलगा /मुलगी / पत्नी, वय------------- वर्षे राहणार-----------------------------------------------------------------या द्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिरकरतेकी

(१) मी --------------------------------------या पदासाठी माझा अर्ज दाखलकेलेला आहे.

(२) आज रोजी मला खालीलप्रमाणेअपत्य (मुले/मुली)आहेत.त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या अपत्य(मुले/मुली)संख्या ----------------आहे.(असल्यास,जन्मदिनाकनमुद करावा.)

| अं. क्र. | अपत्य (मुलाचे/मुलीचे)नांव | जन्मतारीख | वय |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

(३) हयात असलेल्याअपत्यांचीसंख्या दोनपेक्षा अधिकअसेल, किंवा भविष्यात दोनापेक्षा अधिक अपत्य झाल्यास, मानधनी पदासाठी मीअपात्रठरविण्यास किंवा कामावरुन कमीकरण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

(३) उमेदवाराला दोनहयात अपत्यापेक्षा (दत्तक दिलेल्या अपत्यासह ) अधिक अपत्य असल्यास उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही जर सदर बाब नियुक्तीनंतर निदर्शनास आल्यास उमेदवाराला सेवेतून तात्कळ सेवामूक्त करण्यात येईल .तसेच सेवा कालावधीमध्ये त्यास दोनहयात अ ९*पत्य (दत्तकदिलेल्या अपत्यासह), असून देखील तिसरे अपत्य झाल्यास त्याच्या सेवा समाप्त करण्यात येईल याची मला जाणिव आहे.

ठिकाण:- उमेदवाराचे नांव -------------------------------

दिनांक :- स्वाक्षरी -------------------------------

# स्वयंघोषणापत्र

मी खालीसहीकरणार --------------------------------------------------------------स्वयंघोषणापत्र सादरकरीते की, मी अहिल्यानगर नगरपालिका / नगरपंचायत या क्षेत्रातील ---------------------या ठिकाणची स्थानिक रहिवाशी आहे, सदरची खरी आहे. माहितीखोटी आढल्यास अंगणवाडी मदतनीस या पदासाठी झालेली निवडीस मी अपात्र राहील व नियमानुसार कारवाईस पात्र राहील.

ठिकाण:- उमेदवाराचे नांव --------------------------------

दिनांक :- स्वाक्षरी --------------------------------

# विधवा असल्याबाबत स्वयंघोषणापत्र

उमेदवाराचा अलिकडील काळातील काढलेला रंगीत फोटो

मी --------------------------------------------------------------- श्री----------------------------------------

यांचा मुलगा / मुलगी वय ------------- वर्ष आधार कार्ड क्रमांक (असल्यास)-------------------------------------------

व्यवसाय ------------------------------- राहणार ---------------------------------------------------------------या व्दारे

घोषित करते की, मी राहणार -----------------------------------------------ता.----------------- जि.------------------

येथील रहिवासी असून माझे पती कै. ------------------------------------------------------- हे मयत झालेले असून मी विधवा आहे. तसेच मी पूर्नविवाह केलेला नाही.

तसेच मी याव्दारे घोषित करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तिगत माहिती व समजुतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास भारतीय दंड संहिता अन्वये आणि / किंवा संबंधित कायद्यानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन . तसेच सदर स्वयंघोषणापत्रकाव्दारे मला मिळालेले सर्व लाभ सर्वकषरित्या काढून घेण्यास येतील याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण:- उमेदवाराचे नांव -------------------------------

दिनांक :- स्वाक्षरी -------------------------------